## दिवाणी दावा क्रमांक १४८/२०२४ मधील नि.क्र.१३ वरील आदेश

(अंजनाबाई व इतर वि. कैलास व इतर)

वादीने प्रस्तुत अर्ज हा न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करण्यासाठी दाखल केला आहे. वादीचे कथन की, सन १९९२ साली मौजे पाळे बु. ता. कळवण जि. नाशिक येथील ग.नं.९८ चे पवार व शकुंतला केदा पवार यांचेत वाटप झाले होते. त्याची महसुल दप्तरी नोंद नं.७७७ मंजुर झाली होती. सदर वाटपानुसार दावा कलम १अ मध्ये नमुद केलेली मिळकत ही कारभारी पुंडलिक पवार यांच्या वाटपास आली. दावा कलम १ब मध्ये नमुद केलेली मिळकत ही वादी नं.०१ यांच्या वाटपास आली. तसेच दावा कलम १ क मध्ये नमुद केलेली मिळकत ही अभिमन जयराम पवार यांच्या वाटपास आली. दावा कलम १ड मध्ये नमुद केलेली मिळकत ही बळीराम जयराम पवार यांच्या वाटपास आली. ग.नं.९८ चे वाटप झाले. मात्र वाटपानंतर ग.नं. ९८ च्या पोटहिश्यांच्या हद्दीखुणा अदयापही निश्चित झाल्या नाहीत.

**०२.** वादींचे पुढे कथन की, सन २००२ साली कै. कारभारी पुंडलिक पवार, कै. अभिमन जयराम पवार, कै. बळीराम जयराम पवार व वादी नं.०१ यांच्यात रस्त्यावरुन वाद झाल्याने सदर व्यक्तींनी वादी नं.०१ यांच्या वाटणीपासुन दक्षिण उत्तर गिरणा काठापर्यंत रस्ता ठेवला त्याबाबत महसुल दप्तरी नोंद नं.१११८ मंजुर झाली. दावा कलम १इ मध्ये नमुद केलेला रस्ता हा ग.नं.९८ च्या मोजणी होवुन हद्दी खुणा निश्चित करुन काढलेला नाही. त्यामुळे अदयापही ग.नं.९८ मध्ये कुठलाही रस्ता अस्तित्वात नाही. वादी हे दावा कलम १ अ ते १ड हया शेतमिळकतींची पोटहिस्सा मोजणी होवुन दावा कलम १इ मध्ये नमुद केलेल्या रस्त्याच्या हद्दी खुणा निश्चित करुन दावा कलम १ अ व १ब मधुन नोंद नं.१११८ प्रमाणे रस्ता काढुन देण्यास देखील तयार आहेत. प्र.वादी यांना दावा कलम १क व १ड हया मिळकतीतुन रस्ता काढुन दयावयाचा नाही, तसेच वादी यांना सदर रस्ता वापरु देखील दयावयाचा नाही

त्यामुळे प्र.वादी हे ग.नं.९८ पैकी दावा कलम १अ ते १इ मध्ये नमुद केलेल्या मिळकतींचे व रस्त्याची हद्दी खुणा निश्चित करण्यास वादी यांना विरोध करीत आहेत. वादी व प्र.वादी यांच्या दरम्यान रस्त्यावरुन वाद आहे. वादी व प्र.वादी यांच्या वाटपाच्या नोंदी अन्वये हद्दी खुणा निश्चित न झाल्याने वाटपादरम्यान वादी व प्र.वादी यांनी स्वतःच्या वापरासाठी ठेवलेला रस्ता वादी व प्र.वादी यांना निश्चित करता आला नाही. त्यामुळे वादी व प्र.वादी यांच्या दरम्यान रस्त्यावरुन वाद आहे. त्यासाठी दावा कलम १अ ते १ड मध्ये नमुद केल्याप्रमाणे मिळकतींची पोटहिस्सा मोजणी होणे न्यायाच्या दृष्टीने जरुरी आहे व सदर पोटहिस्सा मोजणी होवुन हद्दी खुणा निश्चित झाल्याशिवाय वादी व प्र.वादी यांना रस्ता निश्चित करता येणार नाही. सबब वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन तो मंजुर करावा अशी विनंती केली.

**०३.** प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. प्र.वादींचे म्हणणे की, अर्ज खोटा आहे. प्रतिवादींनी यापुर्वी मोजणी फी भरली आहे परंतु मोजणी झाली नाही किंबहुना वादींनी मोजणी होउ दिली नाही. प्रतिवादींना रस्ता दयावा लागु नये म्हणुन वादींनी प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. करीता, सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** वादींचा अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्र.वादींच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** वादीने सदरचा दावा हा जाहीर होउन मिळण्यासाठी व दावामिळकतीचे पोटहिश्यांची मोजणी होउन मिळावी या मागणीकरीता दाखल केला आहे. वादींचे असे कथन आहे की, वादी व प्र.वादी दरम्यान झालेल्या वाटपाप्रमाणे जमीनीची पोटहिश्यांची मोजणी झाल्याशिवाय वादातीत रस्तयाच्या हद्यीखुणा निश्चित करता येणार नाही. मुळात प्रस्तुत दावा हा दावामिळकत मौजे पाळे बु. ता. कळवण जि.

नाशिक येथील ग.नं.९८ ची मोजणी होउन वाटपाप्रमाणे पोटहिश्यांचा हद्दीखुणा निश्चित होउन मिळण्याकामी दाखल केला आहे. अशा परिस्थितीत वादीने मागणी केलयाप्रमाणे मोजणी झाल्यास वादातील रस्त्याचे क्षेत्र देखील निश्चित होणार आहे. वादीने मागणी केल्याप्रमाणे दावामिळकत गट क्र.९८ या संपुर्ण गटाची सातबारा उतारा क्षेत्राचा रेकॉर्डप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या हिश्यास वाटपाने आलेल्या क्षेत्राची कब्जानुसार मोजणी होउन त्यांच्या हद्दीखुणा व त्यांनी ठेवलेला १५ फुट रुंदीच्या रस्त्याच्या हद्दीखुणा न्यायालयीन आयुक्तांमार्फत कायम झाल्या तर निश्चितच वस्तुस्थितीदर्शक अहवाल अभिलेखावर येईल व त्यामुळे सदर प्रकरणाचा निकाल गुणवत्तेवर लावण्यास निश्चितच मदत होईल. सदर वाद हा जमिनीसंबंधी असुन पक्षकारांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळे न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करणे आवश्यक वाटते. न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक केल्यास प्र.वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

०१. वादीचा अर्ज नि.क्र.१३ मंजूर करण्यात येतो.

०२. तालुका निरिक्षक/उपअधिक्षक भुमी अभिलेख, कळवण यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येते.

०३. न्यायालयीन आयुक्तांना असे निर्देशीत करण्यात येते की त्यांनी मौजे मौजे पाळे बु. ता. कळवण जि. नाशिक येथील ग.नं.९८ ता.कळवण येथील या संपुर्ण गटाचा सातबारा उतारा क्षेत्राचा रेकॉर्डप्रमाणे व त्यांच्यातील वाटपाप्रमाणे वहिवाटीतील, कब्जानुसार क्षेत्राची मोजणी होउन त्यांच्या हद्दीखुणा व त्यांनी ठेवलेला १५ फुट रुंदीच्या रस्त्याच्या हद्दीखुणा दर्शवुन मोजणी करावी व वादी आणि प्रतिवादी

यांच्या जमीनीच्या क्षेत्राचा वस्तुस्थिती दर्शक मोजणी अहवाल तीन महिन्याच्या आत सादर करावा.

**०४.** वादीला असे निर्देशीत करण्यात येते की त्यांनी सदर आदेशापासुन गट क्र.९८ च्या मोजणीबाबत पंधरा दिवसांच्या आत मोजणी फी संबंधीत कार्यालयात जमा करावी.

MEGHARAJ VAMANRAO JAWALE

Digitally signed by MEGHARAJ VAMANRAO JAWALE
Date: 2025.11.06 16:57:23 +0530

दिनांक – ०६/११/२०२५.

( एम.व्ही. जावळे )

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कळवण.